स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

शोधप्रबंधाचा गोषवारा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्य विद्याशाखेतील तत्त्वज्ञान विषयातील पीएच.डी. पदवीकरिता सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा गोषवारा

-: संशोधन विषय :-

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास"

संशोधक

तनुजा प्रकाश येलाले

मार्गदर्शक

डॉ. सुनील साळुंके

प्राध्यापक व तत्त्वज्ञान विभाग प्रमुख

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

१) प्रस्तावना:

मानवी संस्कृतीचा इतिहास हा मानवी संघर्षाचा इतिहास आहे. निसर्ग, अन्य सजीव आणि अन्य मानवी समूह यांच्या संबंधाने आणि संदर्भाने मानवी इतिहास लिहिला गेला. निसर्गाचे अन्य घटक आणि मानव यामध्ये जे अनेक फरक आहेत त्यातला सगळ्यात महत्त्वाचा फरक मानवाने केलेल्या बुद्धीच्या वापराचा आहे. बुद्धी आणि चेतना कमीअधिक प्रमाणात सर्वच सजीवांमध्ये मूलभूत प्रेरणेच्या कार्याच्या स्वरूपात अस्तित्त्वात असते हे जरी मान्य केले तरी मानवी वंशामध्ये असलेला तिचा वावर आणि वापर या दोन्ही गोष्टी इतर सजीवांपेक्षा निश्चितच जास्त ठळक आहेत.

मनुष्यप्राणी सातत्याने विश्वाचे स्वरूप, त्या स्वरुपानुरूप आपल्या सुविधा आणि समस्यांमध्ये होणारे बदल आणि आपले अस्तित्त्व टिकवण्यासाठी या बदलांशी जुळवून घेत करावा लागणारा संघर्ष या त्रिकूटाभोवती आपले जीवन घडवत असतो. मानवी इतिहासाच्या विविध टप्प्यांवर माणसाचा विश्वाचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न आणि होणाऱ्या बदलाशी जुळवून घेण्याची त्याची धडपड आपल्याला दिसते. २० व्या शतकातून २१व्या शतकाकडे मानवाने जेव्हा पाऊल टाकले तेव्हा विश्वाच्या स्वरूपाच्या मानवी समजुतीत झालेला बदल हा आधीच्या अनेक टप्प्यांपेक्षा अनेक अर्थानी वेगळा होता. यंत्र क्रांतीच्या युगानंतर सुरु झालेल्या आधुनिक कालखंडाने ज्या अनेकानेक समस्या मानवासमोर उभ्या केल्या होत्या आणि ज्या बदलाच्या चक्रातून अजूनही मानव पूर्णपणे सावरला नाही ते चक्र २१ व्या शतकाच्या आरंभी अधिकच वेगाने फिरू लागले आहे. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या या नव्या युगाने मानवी समाजासमोर ज्या समस्या निर्माण केल्या आहेत आणि आपल्या दृष्टीक्षेपात असणाऱ्या परंतु नजीकच्या भविष्यात येऊ घातलेल्या अनेक समस्या यांचा विचार करणे आपल्यासाठी आता विशेष महत्त्वाचे ठरू पाहत आहे.

आपल्या समोर निर्माण होणाऱ्या नवनवीन समस्यांचे समाधान शोधणे हे मानवाचे इतिकर्तव्यच आहे. गेल्या अनेक शतकांचा आढावा घेतला असता आपल्याला असे दिसून येते की भावी काळातील समस्यांची सोडवणूक करण्याची क्षमता मानवामध्ये निर्माण व्हावी यासाठी त्या त्या काळातील शिक्षणव्यवस्थेमध्ये

भविष्यानुकूल बदल करण्याचा प्रयत्न केला गेला. ज्यातून काही पिढ्यांच्या प्रयत्नांती हे बदल समाजजीवनात दिसू लागले. अर्थात भविष्यात हव्या असलेल्या बदलांना घडवून आणण्याची जबाबदारी समाजाने नेहमीच शिक्षण व्यवस्थेकडे दिली आहे. जर २१व्या शतकात मानवी समूहापुढे काही नव्या आणि वेगळ्या स्वरूपाच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता असेल तर त्या समस्यांचे समाधान शोधण्याची जबाबदारी शिक्षण व्यवस्थेकडे दिली जाऊ शकते का? आणि अशी जबाबदारी शिक्षण व्यवस्थेकडे द्याची असेल तर ती शिक्षण व्यवस्था कश्या स्वरूपाची असायला हवी? २० व्या शतकात कोणत्या प्रकारचे बदल शिक्षण व्यवस्थेत झाले आणि या बदलांचा आधार काय होता? इत्यादी प्रश्नांचा विचार करणे आवशयक ठरते.

२० व्या शतकातील शिक्षण व्यवस्थेतील बदलांवर मोठा प्रभाव फलप्रामाण्यवादी तत्त्वज्ञानाचा असल्याचे दिसते. याचा संदर्भ २१व्य शतकातील मानवी जीवनाशी कश्या प्रकारे जोडता येईल? तसेच २१ व्या शतकातील उपयोजनासाठी कोणत्या तत्त्वप्रणाली आणि तत्त्वप्रवाहांचा उपयोग होईल? त्याचप्रमाणे कोणत्या शैक्षणिक तत्त्वचिंतनावर आधारित शिक्षणव्यवस्था माणसासमोर येऊ घातलेल्या नव्या समस्यांचे समाधान देऊ शकले? या आणि अशाच अनेक प्रश्नाची उत्तरे शोधण्यासाठी २०व्या शतकातील शैक्षणिक तत्त्वचिंतनाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. सदर पार्श्वभूमीचा विचार करता ज्या पौर्वात्य आणि पाश्च्यात्य जगातील आधुनिक तत्त्वचिंतकांनी आपल्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाच्या आधारे त्याच्या समोरील समस्यांचे समाधान शोधण्याचा प्रयत्न केला. ज्यांच्या प्रयत्नांमध्ये काही समान धागा आपल्याला सापडतो त्यांच्या तत्त्वज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास करणे कोणत्याही तत्त्वविचारांचे उपयोजन समजून घेण्यासाठी मूलभूत ठरेल. त्यामुळेच २० व्या शतकातील दोन शैक्षणिक तत्त्वचिंतक ज्यांनी केवळ तात्त्वीक चर्चा करून न थांबता आपल्या तत्त्वचिंतनाचे उपयोजनही करण्याचा एका मर्यादेपर्यंत यशस्वी प्रयत्न केला त्यांच्या तत्त्वचिंतनाचा अभ्यास करण्याचे प्रस्तुत संशोधनामध्ये प्रयोजिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी सदर प्रस्ताव मांडण्यात येत आहे.

२) तत्त्वज्ञान म्हणजे काय?

मानवाची आंतरिक प्रेरणा आपल्या सभोवतीच्या परिसराचे स्वरूप आणि त्यातील बदलांचे परिणाम समजून घेण्याची आहे. ज्यामुळे त्याला हे विश्व आणि त्यामागे असणारे अंतिम तत्त्व जाणणे महत्त्वपूर्ण वाटते. प्राचीन काळापासून मानवाने विश्वाच्या मुळाशी असणाऱ्या अंतिम सत्तेचे जे चिंतन केले, विश्वाच्या स्वरूपाची जी समीक्षा केली त्यातून तत्त्वज्ञानाची निर्मिती झाली. तत्त्वज्ञानामध्ये मानवी जीवन आणि विश्वाच्या अंतिम स्वरूपाविषयीच्या समस्यांबद्दलचे विचार, दृष्टिकोन आणि भूमिका पद्धतशीरपणे मांडले जातात. सर्व मानवी अनुभवांची सुसंगत व्यवस्था आणि अर्थ लावणे हे तत्त्वज्ञानाचे प्रमुख कार्य आहे.

तत्त्वज्ञानास इंग्रजीमध्ये “Philosophy” हा शब्द वापरला जातो. “Philosophy” हा इंग्रजी शब्द “Philosophia” ह्या ग्रीक शब्दापासून उत्पन्न झालेला आहे. “Philosophia” हा ग्रीक शब्द “Philo” आणि “Sophia” या दोन शब्दांच्या संयुगातून निर्माण झालेला आहे. “Philo” म्हणजे प्रेम आणि “Sophia” म्हणजे शहाणपण होय. यावरून “Philosophy” या शब्दाचा अर्थ शहाणपणाविषयीचे प्रेम असा होतो. जो तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतो, तत्त्वचिंतन करतो तो तत्त्वचिंतक होय. तत्त्वचिंतकास इंग्रजीमध्ये Philosopher असे संबोधले जाते. तत्त्वचिंतक हा ज्ञानाचा शोध घेणारा, शहाणपणाविषयी प्रेम असणारा असा व्यक्ती असतो. प्लेटो या प्रसिद्ध ग्रीक तत्त्वचिंतकाच्या मते संपूर्ण सृष्टीच्या प्रवाहाकडे तटस्थपणे, स्थिरपणे पाहणारा प्रेक्षक म्हणजे तत्त्वचिंतक होय. भारतीय संदर्भात तत्त्वज्ञानाला "दर्शन" असे म्हटले जाते. दर्शन याचा अर्थ "दृष्टी" व "दृष्टीसाठीची उपयुक्त साधने" असा असून तत्त्वज्ञानाच्या संदर्भात दर्शन याचा अर्थ "जीवनविषयक समर्पक दृष्टी" असा आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचा आरंभ विश्वातील अंतिम सत्तेची अनुभूती घेण्याच्या मानवाच्या प्रेरणेतून झाला. याची बीजे व पुढील विस्तार वेद, उपनिषदे, दर्शनग्रंथ यामध्ये झालेला दिसतो.

विश्वाविषयीच्या कुतूहलभावनेतून सुरु झालेल्या तत्त्वविचारांना निसर्गातील चमत्कारांचे कोडे बुद्धीच्या साहाय्याने सोडवण्याच्या प्रयत्नांमुळे तत्त्वचिंतनाचे स्वरूप प्राप्त झाले. तत्त्वज्ञानाची मांडणी समीक्षात्मक, चिंतनात्मक मीमांसा या स्वरूपात केली जाऊ लागली. तत्त्वचिंतक बाह्य जगातील भौतिक

वस्तू व घटनांचे विश्लेषण करत होतेच पण त्याचबरोबर त्यामागे असणाऱ्या मूलभूत तत्त्वांचाही शोध घेऊ लागले. प्राथमिक स्वरूपातील भौतिक अस्तित्त्वे आणि अधिभौतिक गूढ अनुभूती यांचाही तत्त्वज्ञानाच्या कार्यक्षेत्रात समावेश झाला. यातूनच सत्तामीमांसा, ज्ञानमीमांसा, नीतिमीमांसा, तर्कमीमांसा, सौंदर्यमीमांसा अशा तत्त्वज्ञानाच्या प्रमुख शाखांचा उगम आणि विकास झाला. या प्रमुख पाच शाखांशिवाय तत्त्वज्ञानाचा विस्तार मानवी जीवनाशी निगडित विविध पैलूंपर्यंत झाला. त्यातूनच धर्माचे तत्त्वज्ञान, विश्लेषणात्मक तत्त्वज्ञान, स्त्रीवादी तत्त्वज्ञान, सामाजिक - राजकीय तत्त्वज्ञान, शैक्षणिक तत्त्वज्ञान या उपशाखांचा विकास झाला.

३) शैक्षणिक तत्त्वज्ञानाची संकल्पना:

प्रत्येक व्यक्ती, समाज व राष्ट्राच्या जडणघडणीमध्ये शिक्षणप्रक्रियेचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. जे राष्ट्र जेवढे शिक्षित तेवढेच ते सर्व क्षेत्रांमध्ये शक्तिसंचय करून जगामध्ये सर्वोच्च स्थान प्राप्त करण्याच्या आपल्या गौरवशाली प्रक्रियेमध्ये आघाडीवर असते. खऱ्या अर्थाने परिपूर्ण शिक्षण तेच असते जे मनुष्यमात्राच्या मन-बुद्धीवर पडलेले अज्ञानाचे आवरण दूर करून त्याच्या पूर्णत्त्वाच्या विकासाच्या प्रक्रियेला साहाय्यभूत ठरेल. शिक्षणाचे तत्त्वज्ञान हे शिक्षण आणि त्याअनुषंगाने येणाऱ्या विविध समस्यांचा तत्त्वज्ञानात्मक अभ्यास होय. या अभ्यासाची पद्धती ही तत्त्वचिंतनात्मक, मूलगामी आणि चिकित्सक असते. शैक्षणिक तत्त्वज्ञान हे शिकण्याच्या प्रक्रियेविषयी आणि शिक्षणातून होणाऱ्या प्राप्तीविषयीची चिकित्सा करते. शिक्षणाचे मानवी जीवनातील स्थान आणि उपयुक्तता यावर विचार केला जातो आणि विविध दृष्टिकोनांतून भूमिका मांडली जाते. विविध तत्त्वचिंतकांनी शिक्षणाच्या स्वरूप, प्रक्रिया आणि उपयुक्ततेविषयी जी मते मांडली आहेत त्यावरून त्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान तयार होते.

४) संशोधन विषयाचे महत्त्व (Importance of Research) :

शैक्षणिक तत्त्वज्ञान हा तत्त्वज्ञानातील चर्चिला गेलेला एक अतिशय महत्त्वपूर्ण भाग आहे. विविध तात्त्विक कल्पना आणि विचारांचे मानवी

जीवनातील उपयोजन ज्या काही मोजक्या उपशाखांद्वारे केले जाते त्यात शैक्षणिक तत्त्वज्ञान ही अत्यंत प्राचीन उपशाखा आहे. अनेक तत्त्वचिंतकांनी शिक्षणविषयक विचार आणि उपपत्ती मांडल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांच्या समाज तसेच शिक्षण विषयक तत्त्वज्ञानाचे उपयोजन समकालीन कालखंडात कशा प्रकारे करता येईल याचा विचार प्रस्तुत अभ्यासामध्ये करता येईल. तत्त्वज्ञानात्मक संकल्पनांचे आणि विचारांचे प्रत्यक्ष मानवी जीवनातील उपयोजन समजून घेणे तसेच त्याची समकालीन प्रस्तुतता अभ्यासणे हे या संशोधन विषयाचे महत्त्व असल्याचे आपणास सांगता येते.

विषय निवडीची भूमिका:

प्रस्तुत विषय निवडताना संशोधकाच्या समोर २१ व्या शतकातील मानवी समाजातील काही समस्या होत्या. या समस्यांचे स्वरूप सामाजिक असून त्या मानवाच्या जडणघडणीत काही सुधारणा केल्या असता सोडवता येतील अश्या स्वरूपाच्या आहेत. मानवी जीवनाच्या जडणघडणीतील बराच मोठा आणि महत्त्वाचा कालखंड त्याच्या शैक्षणिक जीवनाचा असतो. त्यामुळे जर मूलतः शिक्षणविषयक दृष्टिकोन बदलता आला तर त्यातून अनेक सामाजिक बदल घडवून आणता येतील असा संशोधकास विश्वास वाटतो. त्यासाठी समकालीन परिस्थितीत जे जास्त प्रस्तुत ठरेल असे शैक्षणिक तत्त्वज्ञान शोधणे या हेतूने या अभ्यासाचे प्रयोजन केलेले आहे.

५) संशोधनाचा उद्देश किंवा उद्दिष्टे (Objectives of Research) :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास', या विषयाचे अध्ययन हे सर्वव्यापी होऊन प्रस्तुत अभ्यास भविष्यकाळात तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरावा यासाठी संशोधनाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे निश्चित केली आहेत.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान आणि विचार याविषयी समर्पक माहिती संकलित करणे

- पावलो फ्रेअरे यांचे तत्त्वज्ञान आणि विचार याविषयी समर्पक माहिती संकलित करणे
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचा आढावा घेणे
- पावलो फ्रेअरे यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचा आढावा घेणे
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाची तुलना करणे
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचे समकालीन उपयोजन तपासणे

६) कार्य संरेखा किंवा प्रबंधाची रूपरेषा:

संकल्पित संशोधनांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास करण्याचे योजिले आहे. सर्वप्रथम विविध तत्त्वचिंतकांच्या दृष्टिकोनातून शैक्षणिक तत्त्वज्ञानाची मांडणी केली जाईल. प्रबंधाचा पहिल्या भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान आणि त्यांचे शिक्षणविषयक तात्त्विक विचार यांचा आढावा घेतला जाईल. त्यानंतर पावलो फ्रेअरे यांचे तत्त्वज्ञान आणि त्यांचे शिक्षणविषयक तात्त्विक विचार यांचा आढावा घेतला जाईल.

प्रबंधाच्या दुसऱ्या आणि जास्त महत्त्वाच्या भागात दोन्ही तत्त्वचिंतकांच्या विचारांचा आढावा घेतल्यानंतर त्यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाची तुलना केली जाईल. यामध्ये दोन्ही तत्त्वचिंतकाच्या तत्त्वज्ञानातील साम्य आणि भेद स्थळे यांची चिकित्सा केली जाईल. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचे उपयोजन आणि २१ व्या शतकातील प्रस्तुतता यांचा विचार केला जाईल.

७) सिद्धांतकल्पना किंवा गृहितक:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे या २० व्या शतकातील तत्त्वचिंतकांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान हे फलप्रामाण्यवादी तत्त्वज्ञानावर आधारलेले आहे. नजीकच्या भविष्यकाळातील मानवी जीवनासमोरील आव्हानांचा विचार करता आपली शिक्षणविषयक विचार, भूमिका आणि धोरणे समस्या आधारीत आणि समस्या सोडवणुकीस प्राधान्य देणारे असणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने विचार करता आधुनिक कालखंडातील तत्त्वचिंतकांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे आणि त्याचे उपयोजित्त्व समजून घेणे आवश्यक ठरते. या संदर्भात प्रस्तुत संशोधनाची सिद्धांतकल्पना पुढील प्रमाणे आहे.

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे यांचे शिक्षणविषयक तत्त्वज्ञान भावी काळातील मानवी जीवनाची दिशा निश्चित करण्यास मार्गदर्शक ठरेल तेव्हा त्याची चिकित्सा करून त्याची स्विकार्ह्यता तपासणे शक्य आहे."

८) प्रबंधाची व्याप्ती:

प्रस्तुत संशोधनात शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा आधुनिक कालखंडापुरता मर्यादित विचार केला आहे. आधुनिक कालखंडातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे या दोन तत्त्वचिंतकांच्या मतांचा अभ्यास ही मुख्य व्याप्ती असून त्या आधुनिक शैक्षणिक तत्त्वचिंतनाची पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडातील शैक्षणिक तत्वचिंतनाचा आढावा यथानुरूप करण्यात येईल. तसेच आधुनिक कालखंडातील अन्य तत्वचिंतकांच्या शैक्षणिक विचारांचाही समावेश अनुषंगिक रित्या होईल.

९) संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन करताना प्रामुख्याने चिंतनात्मक, विश्लेषणात्मक आणि तुलनात्मक पद्धतीचा वापर करण्यात येईल. सदर संशोधनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे यांचे मूळ लेखन तसेच या दोन्ही तत्त्वचिंतकांच्या

शैक्षणिक तत्त्वज्ञानावर केले गेलेले दुय्यम लेखन याचा आशय विश्लेषणात्मक पद्धतीचा उपयोग करून अभ्यास करण्याचे योजिले आहे.

१०) शोध प्रबंधातील प्रकरण रूपरेषा

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी अभ्यास पुढील प्रमाणे पाच प्रकरणांत विभागण्याचे प्रस्तावित केले आहे. या प्रत्येक प्रकरणाची रचना सारांशरूपाने खालील प्रमाणे असेल.

प्रकरण पहिले: प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन शीर्षकाचे स्पष्टीकरण करण्यात येईल. या प्रकारांमध्ये शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे स्वरूप, विविध तत्त्ववेत्यांचे विचार, शिक्षणविषयक उपपत्ती यांचे स्पष्टीकरण करण्यात येईल. आधुनिक कालखंडातील शिक्षणविषयक तत्त्वज्ञानात झालेले बदल आणि त्यांचा मानवी जीवनावर झालेला परिणाम याची सविस्तर व चिकित्सक माहिती देण्यात येईल. तसेच या प्रकरणामध्ये संशोधन निवडीची भूमिका, संशोधनाचे महत्त्व, उद्दिष्ट, व्याप्ती, संशोधन पद्धती, प्रस्तावित सिद्धांतकल्पना आणि नियोजित प्रकरणांची रूपरेषा इत्यादी सविस्तर पद्धतीने स्पष्ट करण्यात येईल.

प्रकरण दुसरे: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक तत्त्वज्ञान

प्रस्तुत प्रकरणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाचा विस्तृत आढावा घेतला जाईल. त्यांच्या लेखनातून स्पष्ट होणारे त्यांचे शिक्षणविषयक विचार, त्यांच्या विचारावरील विविध तत्त्वचिंतकांच्या विचाराचे प्रभाव तसेच त्यांच्या शिक्षणविषयक विचारांचा अन्य अभ्यासकांनी घेतलेला आढावा याचा सविस्तर अभ्यास या प्रकरणामध्ये केला जाईल.

प्रकरण तिसरे: पावलो फ्रेअरे यांचे शिक्षणविषयक तत्त्वज्ञान

प्रस्तुत प्रकरणामध्ये पावलो फ्रेअरे यांच्या तत्त्वज्ञानाचा विस्तृत आढावा घेतला जाईल. त्यांच्या लेखनातून स्पष्ट होणारे त्यांचे शिक्षणविषयक विचार, त्यांच्या विचारावरील विविध तत्त्वचिंतकांच्या विचाराचे प्रभाव तसेच त्यांच्या शिक्षणविषयक विचारांचा अन्य अभ्यासकांनी घेतलेला आढावा याचा सविस्तर अभ्यास या प्रकरणामध्ये केला जाईल.

प्रकरण चौथे: डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास

प्रस्तुत प्रकरणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानातील साम्य आणि भेदस्थळे यांचा आढावा घेतला जाईल. २०व्या शतकातील शिक्षण क्षेत्रातील बदलांचा शैक्षणिक तत्त्वचिंतनावर पडलेला प्रभाव आणि शैक्षणिक तत्त्वचिंतनाचा शिक्षण क्षेत्रावर झालेला परिणाम यांचा परस्पर संबंध आणि त्या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे ही यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे वेगळेपण अधोरेखित करण्याचा प्रयत्न या प्रकरणामध्ये केला जाईल.

प्रकरण पाचवे: निष्कर्ष व उपसंहार

या प्रकरणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे यांच्या शिक्षणविषयक तत्त्वचिंतनाची प्रासंगिकता आणि भावी काळाच्या अनुषंगाने त्याचे उपयोजनमूल्य यांचा विचार केला जाईल. २१ व्या शतकामध्ये प्रवेश करत असताना आणि माहिती तंत्रज्ञानाचा विस्फोट झालेल्या या नव्या कालखंडातील मानवी जीवनासमोर निर्माण झालेल्या समस्यांचा विचार करता अधिक प्रगत मानवी जीवन हे अधिक मानवी मूल्यांवर आधारलेले असावे ही मूलभूत अपेक्षा पूर्ण करायची असेल तर मुळात शिक्षणविषयक तत्त्वचिंतनाचा पुनर्विचार करणे

ही काळाची गरज ठरली आहे. तिसऱ्या सहस्त्रकाचा मानव कसा घडावा हे आपण केवळ आपल्या शैक्षणिक तत्त्वचिंतनाच्या आणि त्याच्या होणाऱ्या उपयोजनाच्या सहाय्यानेच निश्चित करू शकतो. यासाठीच प्रस्तुत संशोधनाची उपयुक्तता डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पावलो फ्रेअरे यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाच्या चिकित्सेमधून सिद्ध करता येते.

संदर्भग्रंथ व लेखसूची (Bibliography)

1. डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विज्ञान डी वाय हाडेकर
2. Ambedkar, B. R. (1990). Dr. Babasaheb Ambedkar: Writings and Speeches, Vol. 7. Government of Maharashtra, Bombay, 243.
3. Freire, P. (1996). Pedagogy of the oppressed (revised). New York: Continuum, 356, 357-358.
4. P. P. Gokhale, (2008). Ambedkar as a Philosopher, Indian Philosophical Quarterly, SPPU
5. Gaztambide-Fernández, R., Brant, J., & Desai, C. (2022). Toward a pedagogy of solidarity. Curriculum Inquiry, 52(3), 251-265.
6. Ahire, S. (2018). Education s role in Democracy: Ideas of Dewey, Ambedkar, Freire and Giroux.
7. *Jaffrelot*, Christophe, (2005) *Dr. Ambedkar and Untouchability : Analyzing and Fighting Caste*, Permanent Black, Delhi
8. Moon, Vasant (Compiled), *Dr. Babasahed Ambedkar Writings and Speeches,* Education Department, Government of Maharashtra, Bombay
9. *Kasbe* Raosahed, (2006), *Ambedakara Ani Marksa,* Sugava Publication, Pune Second Edition.
10. Simon, L. R. (2014). The Reclamation of Human Personality: Paulo Freire and Bhimrao Ramji Ambedkar in comparative perspective.

11. Stroud, S. R. (2017). What Did Bhimrao Ambedkar Learn from John Dewey's Democracy and Education?. Pluralist, 12(2), 78-103.
12. Zene, C. (2018). Justice for the excluded and education for democracy in BR Ambedkar and A. Gramsci. Rethinking Marxism, 30(4), 494-524.
13. Velaskar, P. (2012). Education for liberation: Ambedkar’s thought and Dalit women’s perspectives. Contemporary Education Dialogue, 9(2), 245-271.
14. Omvedt, G. (2017). Ambedkar: towards an enlightened India. Penguin UK.
15. Sahiti, M. S., & Srinivas, T. (2019). Relevance of Educational Philosophy of Dr. Br Ambedkar in Contemporary Scenario–An Overview. New Horizons Of Dalit Culture And Literature.
16. Naik, C. D. (2003). Thoughts and philosophy of Dr. BR Ambedkar. Sarup & Sons.
17. AMBEDKAR, D. B. R. 6. DR. BHIM RAO AMBEDKAR AND HIS EDUCATIONAL PHILOSOPHY Sanjeev Kumar. Dr. BR Ambedkar: The Maker of Modern India, 44.
18. Sailakshmi, B., & Reddy, M. G. M. DR. AMBEDKAR’S PHILOSOPHY ON EDUCATION A STUDY.
19. Sharma, M. (2015). Ambedkar’s Struggle for Empowerment of Downtrodden. International Journal of Research in Economics and Social Sciences, 5(6).
20. Kumar, S. Dr. BR Ambedkar’s Idea on Education: A quest for Social Justice in India.
21. Manikandan, R. (2021). Misbeliefs of an Ideal World in Amish Tripathi’s Immortals of Meluha. Turkish Journal of Computer and Mathematics Education (TURCOMAT), 12(2), 1115-1116.
22. STEM, E., & LEADERSHIP, I. (2007). EDUCATION EQUALITY.

मार्गदर्शक
डॉ. सुनील साळुंके
प्राध्यापक व तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

संशोधक
तनुजा प्रकाश येलाले